drppl Dharavi Redevelopment Project

# DHARAVI COMPILED MEDIA REPORT
## 06 Feb, 2025 - 07 Feb, 2025

## Total Mention 19

| Print | Financial | Mainline | Regional | Periodical |
| --- | --- | --- | --- | --- |
| 6 | N/A | N/A | 6 | N/A |

| Tv | Business | English | Hindi | Regional |
| --- | --- | --- | --- | --- |
| 6 | N/A | N/A | N/A | 6 |

| Online |
| --- |
| 7 |

## Print

| No | Newspaper | Headline | Edition | Pg |
|---|---|---|---|---|
| 1. | Pudhari | Even if the number of ineligible slum dwellers in Dharavi decreases, Adani wants more land | Mumbai | 1, 2 |
| 2. | Lokmat | BEST' still waiting for the full-time General Manager post | Mumbai | 2 |
| 3. | Lokmat | Restrictions now on transfer of vacant land in Dharavi | Mumbai | 4 |
| 4. | Janmabhumi | Dharavi Redevelopment Project: Authority approval required before selling or renting out property | Mumbai | 7 |
| 5. | Maharashtra Times | Transfer rights to 'DRP | Mumbai | 5 |
| 6. | Loksatta | Property Transfer in Dharavi from DRP | Mumbai | 1, 2 |

Pudhari • 07 Feb • Dharavi

## Even if the number of ineligible slum dwellers in Dharavi decreases, Adani wants more land

| 1, 2 • PG | 342 • Sqcm | 307657 • AVE | 347.1K • Cir | Bottom Left,Bottom Right |
|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावीत अपात्र झोपडीधारकांची संख्या घटली तरी अदानीला हवी आणखी जमीन

## देवनारच्या आणखी १२४ एकरची मागणी; अपात्र झोपडीधारक आहेत तरी किती, राज्य शासनाचा सवाल

**मुंबई : नरेश कदम**

धारावी पुनर्वसन प्रकल्पाच्या नावाखाली राज्य सरकारकडून भूखंड लाटण्याचा प्रकार अदानी समूहातर्फे केला जात असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. या प्रकल्पाचा खर्च काढण्याच्या नावाखाली व अपात्र झोपडीधारकांचे पुनर्वसन करण्याच्या नावाखाली ४०० एकरहून अधिक जमीन आधीच आपल्या पदरात पाडून घेतलेल्या अदानी समूहाच्याच अंदाजानुसार अपात्र झोपडीधारकांची संख्या जवळपास एक लाखाने कमी झाली असतानाही देवनारच्या आणखी १२४ एकरच्या भूखंडाची मागणी अदानी समूहाने केल्याने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत.


धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानी समूह राबवत आहे. धारावीच्या ६२० एकर जमिनीवर हा प्रकल्प होणार आहे. दुसरी बीकेसी येथे उभी राहणार आहे. तर धारावीमधील अपात्र झोपडीधारकांना, सरकारकडून जमीन घेऊन त्यावर भाड्याची घरे बांधून देण्यात येणार आहे.

धारावी पुनर्वसनाचे कंत्राट मिळाल्यावर अदानी समूहाने राज्य सरकारला केलेल्या पत्रव्यवहारात या प्रकल्पात किमान २ लाख २० हजार अपात्र झोपडीधारक असल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविला होता, अशी माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली. या अपात्र झोपडीधारकांसाठी भाड्याची घरे बांधण्याकरिता ३४३ एकर सरकारी जमीन तेव्हा अदानी समूहाने मागितली होती. मात्र अलिकडेच अदानी समूहाने राज्य सरकारला पाठवलेल्या पत्रात अपात्र झोपडीधारकांची संख्या ९० हजारांनी घटवित ती १ लाख ३० हजार इतकी असल्याचा सुधारित अंदाज वर्तविला आहे. अदानी समूहाने त्यांच्या पातळीवर अनौपचारिक पध्दतीने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे ही आकडेवारी त्यांनी सरकारला कळविली आहे. अपात्र झोपडीधारकांच्यी संख्या अदानी समूहाच्या अंदाजानुसार कमी झाली असतानाही ते आणखी १२४ एकर जागा मागत असल्याने प्रशासनात तीव्र नापसंती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे धारावीमधील अपात्र झोपडीधारकांचा निश्चित आकडा किती आहे, याची विचारणा राज्य सरकारने अदानी समूहाकडे केली आहे.

**एक इंचही देण्याची गरज नाही**

सध्या धारावीत जे लोक राहत आहेत त्या सर्वांना जरी घरे

/...२



### अदानीला मागणीपेक्षाही अधिक जागा

- अदानी समूहाने सुरुवातीला ३४३ एकर जागा मागितली असतानाही राज्य सरकारने आतापर्यंत त्यांना मागणीपेक्षा जास्तच म्हणजे ४१६ एकर जमीन दिली आहे. याशिवाय त्यांना देवनार क्षेपणभूमी(डंपिंग ग्राऊंड)ची अतिरिक्त १२४ एकर जमीन देण्याचा निर्णयही राज्य सरकारने घेतला आहे. देवनारचा भूखंड मिळाल्यावर अदानीला धारावीच्या नावाखाली एकूण ५४० एकर जमीन मिळणार आहे. त्यात देवनारशिवाय मदर डेअरी, कुर्ला- २१ एकर, मालाड- मालवणी-अक्सा - १४० एकर आणि कांजूर-भांडूप-मुलुंड- २५५ एकर या जागांचा समावेश आहे.

# धारावीतील अपात्र झोपडीधारकांची संख्या घटली तरी अदानीला हवी जमीन

पान १ वरुन : द्यायची असतील तरीही अदानी समुहाला यासाठी एकही इंच जागा अतिरिक्त देण्याची गरज नाही, अशा शब्दात नामांकित नगररचना तज्ज्ञ हुसैन इंदोरवाला यांनी राज्य सरकारच्या अदानीवरील भूखंड-वर्षावावर नाराजी व्यक्त केली. मुळात जे लोक धारावीत राहत आहेत, उद्या १० ते १५ मजली इमारती बांधून त्यांना रहायला घरे मिळतील तेव्हा हे लोक सध्या राहत असलेला भूखंड मोकळा होईल व तो इतर व्यावसायिक बांधकामांसाठी अदानी समुहाला वापरता येईल. ज्या २४८ हेक्टर जागेवर लोक धारावीत आज राहत आहेत त्याच जागेवर त्यांच्यासाठी बहुमजली इमारती बांधायला व त्यांना घरे द्यायला जागा कमी पडते, हा युक्तीवादच पूर्णतः खोटारडेपणाचा कळस आहे. प्रकल्पाचा खर्च काढण्यासाठी धावारीतच मोकळा भूखंड आणि त्याव्यतिरिक्त टीडीआर विकण्याचे अधिकार अदानी समुहाला मिळाले आहेत. केवळ या टीडीआर विक्रीतूनच प्रकल्पाचा खर्च निघेल, मग अतिरिक्त जागा का दिली जात आहे, असा प्रश्न इंदोरवाला यांनी केला आहे.अद्याप धारावीचे अधिकृत सर्वेक्षणच झालेले नाही, परिशिष्ट दोन (अॅनिक्सर टू) बनलेले नाही. असे असताना अदानी समुहाने अपात्र झोपडीधारकांचा आकडा कुठून शोधून काढला, असेही ते म्हणाले.

**सर्वात मोठा घोटाळा- ठाकुरता**

आजवरचा हा सर्वात मोठा रिअल इस्टेट घोटाळा असल्याची टीका नामवंत अर्थशास्त्रज्ञ परांजय गुहा ठाकुरता यांनी केली आहे. अदानी समुहाला रिअल इस्टेट क्षेत्रात हजारो कोटी कमावता यावेत म्हणून धारावीच्या नावाखाली जवळपास फुकट जमीन दिली जात असल्याची टीका त्यांनी केली. त्यांनी काही महिन्यांपूर्वी धारावी का दादा कौन? ही डॉक्युमेंटरी करून धारावी पुनर्वसन प्रकल्पातील अनियमतता व अदानी समुहावर सरकारव्दारा केली जात असलेली दौलतजादा चव्हाट्यावर मांडली आहे.

The Adani Group, managing the Dharavi Rehabilitation Project, seeks an additional 5 acres of land in Deonar despite a decrease in the number of disqualified hut holders from 103,000 to 90,000. The state government has questioned the need for extra land, demanding clarity on the number of ineligible residents.

Lokmat • 07 Feb • Dharavi

## BEST' still waiting for the full-time General Manager post

| 2 • PG | 173 • Sqcm | 172900 • AVE | 604.7K • Cir | Top Right | Hello Mumbai |
|---|---|---|---|---|---|

Mumbai

# पूर्णवेळ महाव्यवस्थापक पदासाठी 'बेस्ट'ला प्रतीक्षाच

### एस. व्ही. आर. श्रीनिवास यांच्याकडे अतिरिक्त भार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एस.व्ही.आर. श्रीनिवास यांच्याकडे 'बेस्ट' उपक्रमाचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला आहे. कुलाबा येथील बेस्ट भवनात गुरुवारी त्यांनी हा पदभार स्वीकारला. या निर्णयामुळे 'बेस्ट'ला पूर्णवेळ महाव्यवस्थापकांसाठी प्रतीक्षाच करावी लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. नवीन महाव्यवस्थापकांनी 'बेस्ट'च्या स्वमालकीच्या ताफ्याकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा आता बेस्ट कर्मचारी संघटनांकडून व्यक्त होत आहे.



एस. व्ही. आर. श्रीनिवास

कुर्ला येथील अपघातानंतर 'बेस्ट'ने त्यामागील कारणे व भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी उपाययोजना करण्यासाठी पाच सदस्यीय समिती स्थापन केली होती. त्यांच्यामार्फत सुरक्षित प्रवासासाठी मार्गदर्शक तत्त्वे, नियमावली तयार करण्याचाही निर्णयही घेतला.

### अर्थसंकल्पात निराशा

मुंबईकरांच्या सुखकर प्रवासासाठी किमान ५ ते ६ हजार स्वमालकीच्या गाड्यांची गरज असताना केवळ एक हजार कोटी अनुदान देऊन बेस्टची निराशा करण्यात आल्याची खंत बेस्ट कामगार सेनेचे सुहास सामंत यांनी व्यक्त केली आहे.

**मुंबईकरांसाठी तिकीट दर कमी ठेवण्याचा तत्कालीन आयुक्तांचा प्रस्ताव असताना त्यामुळे होणाऱ्या नुकसानाची भरपाई म्हणून अनुदानात वाढ करणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले.**

### २४ डिसेंबरपासून पद रिक्त

१ बेस्ट महाव्यवस्थापकांकडून महत्त्वाचे निर्णय घोषित होणे अपेक्षित असतानाच २४ डिसेंबरला अनिल डिग्गीकर यांच्या बदलीचे आदेश काढण्यात आले आणि डॉ. हर्षदीप कांबळे यांची या पदावर नियुक्ती झाली.

२ कांबळे यांनी पदभार स्वीकारलाच नाही. त्यांना २ जानेवारीला मंत्रालयात प्रधान सचिव म्हणून नियुक्ती मिळाली. त्यामुळे बेस्ट महाव्यवस्थापक पद २४ डिसेंबरपासून रिक्त आहे. त्यानंतर अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विन जोशी यांच्याकडे बेस्टचा अतिरिक्त कार्यभार सोपवण्यात आला.

The post of full-time General Manager for BEST remains vacant after Dr. Harshdeep Kamble was appointed Principal Secretary in January. V.R. Srinivas, CEO of the Dharavi Redevelopment Project, has been given additional charge of BEST. Staff organizations are awaiting the new full-time General Manager, as key decisions and safety measures are pending.

Lokmat • 07 Feb • Dharavi

## Restrictions now on transfer of vacant land in Dharavi

| 4 • PG | 157 • Sqcm | 157108 • AVE | 604.7K • Cir | Middle Left | Hello Mumbai |
|---|---|---|---|---|---|

Mumbai

# धारावीत मोकळ्या जमिनींच्या हस्तांतरणावर आता निर्बंध

### पालिकेकडून धारावी पुनर्विकास प्रकल्पाला पत्र सादर

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पासाठी मुलुंडमधील मिठागरांच्या जमिनी घेतल्या जात असतानाच दुसरीकडे आता धारावीमधील मोकळ्या भूखंडांचे हस्तांतरण करता येणार नाही, असे निर्देश देण्यात आले आहेत. यापूर्वी मोकळ्या भूखंडांचे हस्तांतरण झाले असले, तरी त्याच्या मंजुरीसाठी संबंधितांना धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडेच यावे लागणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

महापालिकेच्या जी-उत्तर वॉर्डच्या सहायक आयुक्तांनी धारावी पुनर्विकास प्रकल्पाला एक पत्र दिले आहे. त्यानुसार प्रकल्प क्षेत्रात पालिकेच्या मालमत्ता विभागांतर्गत असणाऱ्या मक्ता आणि भाडेतत्त्वावरील मालमत्ता, रिक्त भूभाग तसेच इतर सर्व मालमत्तांना धारावी पुनर्विकास प्रकल्पाचे नियम लागू होणार आहेत. त्यामुळे हे मोकळे भूखंड किंवा मालमत्ता कोणालाही हस्तांतरण करता येणार नाहीत. १२ ऑगस्ट २०२१ च्या अधिसूचनेनुसार यापूर्वी जरी मोकळ्या भूखंडांचे हस्तांतरण झाले असले, तरी त्याची मंजुरी प्रकल्पाकडून घ्यावी लागणार आहे.



### सर्व्हेसाठी अधिकाऱ्यांना फोन करण्याचे आवाहन

मोकळ्या भूखंडांवरील भाडेकरूंनाही प्रकल्पांतर्गत सर्वेक्षणानंतर घर मिळणार आहे. कुंभारवाडा व इतर मोकळ्या भूखंडांचे आधीचे मालक हे धारावी अधिसूचित क्षेत्राचा भाग आहेत.

**त्यांना पुनर्विकासाचे फायदे मिळणार आहेत. धारावीत घरोघरी प्रत्यक्ष जाऊन केल्या जाणाऱ्या सर्वेक्षणात कागदपत्रांसह माहिती देण्यात असहकार करणाऱ्यांकडे यापुढे सर्वेक्षणासाठी न जाण्याचे प्रकल्प अधिकाऱ्यांनी निश्चित केले आहे.**

जे भाडेकरू काही कारणांमुळे सर्वेक्षणावेळी उपलब्ध राहू शकले नसतील त्यांनी अधिकाऱ्यांना फोन करून सर्वेक्षणाचे काम पूर्ण करून घ्यावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

The Dharavi Redevelopment Project requires approval to transfer free land, vacant plots, and leased properties. Despite previous transfers, the Assistant Commissioner mandated that all transfers must go through the project. Property owners in Kumbharwada are urged to complete surveys to receive redevelopment benefits.

Janmabhumi • 07 Feb • Dharavi

# Dharavi Redevelopment Project: Authority approval required before selling or renting out property

| 7 • PG | 89 • Sqcm | 35455 • AVE | 34.89K • Cir | Middle Right |
|---|---|---|---|---|

Mumbai



## ધારાવી રિડેવલપમેન્ટ પ્રોજેક્ટ: મિલ્કત વેચતાં કે ભાડે આપતાં પહેલાં ઓથોરિટીની મંજૂરી જરૂરી

મુંબઈ, તા. ૬: ધારાવી રિડેવલપમેન્ટ પ્રોજેક્ટ ઓથોરીટી અંતર્ગત આવતી મિલ્કત મામલે પાલિકાના (જી) ઉત્તર વોર્ડના મદદનીશ કમિશનર દ્વારા વિશેષ સૂચના ક્રમાંક ૨૨૭ તારીખ ૧૨ ઓગસ્ટ,૨૦૨૧ મુજબ બહાર પાડવામાં આવી છે. જે અનુસાર ફ્રી હોલ્ડ, લીઝહોલ્ડ અને ખાલી જમીન (વીએલટી) અને અન્ય તમામ મિલકતો સંબધિત કોઈ પણ કેસ મિલકત વિભાગમાં સીધા ટ્રાન્સફર કરવો જોઈએ નહીં. વળી સૂચનાના અમલીકરણની તારીખ બાદ કોઈ ટ્રાન્સફર કરવામાં આવ્યું હોય તો એને સક્ષમ અધિકારીઓની મંજૂરીથી ઉલ્ટાવી દેવામાં આવે. ધારાવી રિડેવલપમેન્ટ પ્રોજેક્ટ અંતર્ગત પાલિકાની જમીન, મિલ્કત અને ભાડે પેટે આપેલી મિલ્કત અને ખાલી જમીન મામલે કોઈ પણ નિર્ણય લેતા પહેલા ઓથોરીટીની પરવાનગી મેળવવી જરૂરી છે. આ મંજૂરી બાદ જ એને સક્ષમ અધિકારીને મોકલવામાં આવે.

મહારાષ્ટ્ર સરકાર અને અદાણી ગ્રુપ દ્વારા ધારાવી રિડેવલપમેન્ટ પ્રોજેક્ટ હાથ ધરવામાં આવ્યો છે. જે અંતર્ગત ત્યાં રહેતા ઝુપડાવાસીઓને મફતમાં રહેવા માટે ઘરો આપવામાં આવશે.

A special notification from the Assistant Commissioner of Mumbai's North Ward mandates that all property under the Dharavi Redevelopment Project Authority, including freehold, lease, and vacant land, cannot be transferred without the Authority's approval. The Dharavi Redevelopment Project, led by the Maharashtra Government and Adani Group, aims to provide free homes to slum dwellers.

Maharashtra Times • 07 Feb • Dharavi

## Transfer rights to 'DRP

| 5 • PG | 167 • Sqcm | 379997 • AVE | 1.3M • Cir | Middle Left |
|---|---|---|---|---|

Mumbai

# हस्तांतरण अधिकार 'डीआरपी'कडे

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

धारावीतील मुंबई महापालिकेच्या अखत्यारीतील मालमत्ता विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या सर्व मालमत्तांच्या हस्तांतरणाचे अधिकार १२ ऑगस्ट २०२१ रोजीच्या अधिसूचनेनुसार यापुढे धारावी पुनर्विकास प्रकल्पाकडे

**धारावीतील पालिकेच्या मालमत्तांबाबत अंमलबजावणी**

(डीआरपी) सोपविले जाणार आहेत. मुंबई महापालिकेने ६ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकानुसार या निर्णयाची अंमलबजावणी होणार आहे. मात्र, या निर्णयास स्थानिक धारावीवासीयांप्रमाणे धारावी बचाव आंदोलनानेही विरोध दर्शविला आहे.

धारावी पुनर्विकासासाठी धारावी पुनर्विकास प्रकल्प/प्राधिकरणाची (डीआरपी) नियुक्ती झाली आहे. त्यानुसार, डीआरपीच्या क्षेत्रात मुंबई महापालिकेकडील मालमत्ता विभागाच्या अंतर्गत असणाऱ्या मत्ता, भाडेतत्त्वारील मालमत्ता, रिक्त भूभाग आणि अन्य सर्व मालमत्ता डीआरपी प्रकल्पाकडे समाविष्ट असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे. त्याप्रमाणे, १२ ऑगस्ट २०२१ रोजी डीआरपीअंतर्गत येणाऱ्या मालमत्तांसंदर्भात अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. त्याआधारे, १२ ऑगस्ट २०२१ नंतर मुंबई महापालिका मालमत्ता विभागाच्या सर्व मत्ता, भाडेतत्त्वावरील मालमत्ता, रिक्त भूभाग आणि इतर सर्व कोणतीही प्रकरणे महापालिकेकडे हस्तांतरित करण्यात येऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.



मुंबई महापालिकेच्या जी/उत्तर विभागाच्या सहायक आयुक्तांनी मंगळवारी काढलेल्या परिपत्रकाने धारावीत चर्चेस उधाण आले आहे. मुंबई महापालिकेच्या परिपत्रकात डीआरपी क्षेत्रातील मुंबई महापालिकेच्या जमिनी, मालमत्तांविषयी कोणताही निर्णय घेण्यापूर्वी डीआरपीची पूर्वपरवानगी, मंजुरी, अभिप्राय आदी प्राप्त करूनच ही प्रकरणे डीआरपीकडे पाठवूनच मंजुरी घ्यावी, असे निर्देश दिले आहेत.

या निर्णयाने माटुंगा लेबर कॅम्प, शाहू नगर आदी भागांतील महापालिका चाळी, इमारतीतील रहिवाशांना घरांच्या हस्तांतरणासाठी डीआरपीकडे जावे लागेल, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी दिली.

मुंबई महापालिकेच्या परिपत्रकानुसार मालमत्ता विभागाकडील सर्व जमिनी, त्यावरील बांधकामांचे सर्वाधिकार महापालिकेने डीआरपीच्या माध्यमातून विकासक अदानींकडे सोपवले आहेत. या निर्णयास तीव्र विरोध असल्याचे धारावी बचाव आंदोलनाचे समन्वयक अॅड. राजेंद्र कोरडे यांनी सांगितले.

The Mumbai Municipal Corporation's February 7 circular transfers all property in Dharavi, including assets, leased land, and vacant terrain, to the Dharavi Redevelopment Project (DRP). This decision, following an August 7 notification, has sparked protests from residents and the Dharavi rescue movement, particularly regarding housing transfers from municipal chawls.

Loksatta • 07 Feb • Dharavi

## Property Transfer in Dharavi from DRP

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1, 2 • PG | 239 • Sqcm | 936730 • AVE | 784.32K • Cir | Middle Left,Top Left |

Mumbai

### धारावीमध्ये मालमत्ता हस्तांतरण डीआरपीकडून

**मुंबई :** धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत अधिसूचित क्षेत्रातील मुंबई महापालिकेच्या जागेवरील भाडेतत्त्वावरील मालमत्ता, रिक्त भूभाग आणि इतर सर्व मालमत्तांचे हस्तांतरण आता धारावी पुनर्वसन प्रकल्पाकडून केले जाणार आहे. पालिकेच्या 'जी उत्तर' विभाग सहाय्यक आयुक्तांकडून यासंबंधीचे परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे.

पान २

# मालमत्ता हस्तांतरण 'डीआरपी'कडून

## धारावीतील पालिकेच्या जागेवरील इमारतींसाठी नियम, जी उत्तर विभागाकडून परिपत्रक

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई** : धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत अधिसूचित क्षेत्रातील मुंबई महानगरपालिकेच्या जागेवरील मक्ता, भाडेतत्त्वावरील मालमत्ता, रिक्त भूभाग (व्हीएलटी) आणि इतर सर्व मालमत्तेचे हस्तांतरण आता पालिकेऐवजी धारावी पुनर्वसन प्रकल्पाकडून (डीआरपी) केले जाणार आहे.

जी उत्तर विभागाच्या सहाय्यक आयुक्तांकडून यासंबंधीचे परिपत्रक प्रसिद्ध करण्यात आले आहे. या निर्णयानुसार आता धारावीतील शाहूनगर, माटुंगा लेबर कॅम्प, कुंभारवाडा आदी परिसरातील चाळी, इमारतींमधील सदनिका / गाळ्यांचे हस्तांतरण डीआरपीकडून केले जाणार आहे.

हस्तांतरणाचा निर्णय पूर्वलक्षी प्रभावी लागू करण्यात आला आहे. त्यामुळे २०२१ नंतर हस्तांतरणाची सर्व प्रकरणे सक्षम प्राधिकरणाची अर्थात डीआरपीची मंजुरी घेऊन पूर्ववत करावी लागणार आहेत. धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत धारावीतील ५९७ एकर जागा धारावी पुनर्विकासात समाविष्ट आहे. यात पालिकेच्या मालकीच्या मक्ता, भाडेतत्वावरील मालमत्ता, रिक्त भूभागावरील मालमत्तांचा समावेश आहे. अशा जागांवरील मालमत्ताच्या खरेदी-विक्री व्यवहारानुसार आतापर्यंत पालिकेकडून हस्तांतरण केले जात होते. पण आता मात्र हे हस्तांतरण डीआरपीकडून केले जाणार आहे.

पालिकेच्या जागांवरील मालमत्ता धारावी पुनर्विकास प्रकल्पाअंतर्गत अधिसूचित्र क्षेत्रात समाविष्ट आहेत. त्यामुळे पालिकेच्या जागेवरील मालमत्तांचे हस्तांतरण डीआरपीकडून केले जाईल. हा निर्णय पूर्वलक्षी प्रभावाने लागू केल्याने २०२१ पासून सर्व हस्तांतरणाची प्रकरणे रद्द ठरणार आहेत. डीआरपीची मंजुरी घेऊन ही प्रकरणे पूर्ववत करून घ्यावी लागणार आहेत. दरम्यान, याविषयी जी उत्तर विभागाचे सहाय्यक आयुक्त अजितकुमार आंबी यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, मात्र होऊ शकला नाही.



### माटुंगा लेबर कॅम्प, शाहू नगरातील चाळींचा समावेश

- 'धारावी बचाव आंदोलना'ने या निर्णयावर नाराजी व्यक्त केली आहे. मालमत्ता विभागाच्या अखत्यारीतील सर्व जमिनी आणि त्यावरील मालमत्तांचे हस्तांतरण डीआरपीच्या माध्यमातून एकार्थाने अदानीकडेच सोपवल्याचा आरोप आंदोलनाचे समन्वयक ॲड. राजू कोरडे यांनी केला आहे.
- माटुंगा लेबर कॅम्प, शाहू नगर, कुंभारवाडा आणि इतर परिसरातील चाळी, इमारतींसाठी हा निर्णय लागू होणार आहे. या परिसरातील लोकांना आता डीआरपीकडे पर्यायाने अदानी समुहाकडे जावे लागेल. त्यामुळे हा निर्णय अयोग्य असून याला आमचा विरोध आहे. हा निर्णय पालिकेने त्वरित रद्द करावा अन्यथा यासाठीही आम्हाला आंदोलन करावे लागेल, असा इशारा कोरडे यांनी दिला आहे.

A Mumbai circular mandates that all Dharavi properties, including leased and vacant land, will be transferred through the Dharavi Redevelopment Project (DRP), led by Adani. This affects areas like Matunga Labor Camp and Shahu Nagar. The Dharavi rescue movement opposes this decision, calling for approval before transfers.

# Channel Overview

## Business Channel

No Coverage in this segment

## Hindi Channel

No Coverage in this segment

## English Channel

No Coverage in this segment

# Channel Overview

## Regional & Others Channel

| Total Clip | Top Channel |
| --- | --- |
| **6** | **News18 Lokmat (3)** |

1. News18 Lokmat 3
2. Lokshahi Marathi 3

**News18 Lokmat**
**Dharavi**




The Dharavi redevelopment initiative will take place on a Mumbai Municipal Corporation site in the Tadi Sochi area. The initi...

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 08:41 AM 07 Feb, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Now the work will be done only through Dharavi redevelopment projects.

Headlines • Marathi • 08:27 AM 07 Feb, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




The Dharavi redevelopment initiative will take place on a Mumbai Municipal Corporation site in the Tadi Sochi area. The initi...

Batami 36 Jilhyanchi • Marathi • 08:16 AM 07 Feb, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Headline: Now the works will be done by Dharavi redevelopment projects only.

Headlines • Marathi • 07:56 AM 07 Feb, 2025

**News18 Lokmat**
**Dharavi**




The Dharavi redevelopment initiative will take place on a Mumbai Municipal Corporation site in the Tadi Sochi area. The initi...

Gavakadchya 50 Batmya • Marathi • 07:45 AM 07 Feb, 2025

**Lokshahi Marathi**
**Dharavi**




Now the work will be done only through Dharavi redevelopment projects.

Headlines • Marathi • 06:55 AM 07 Feb, 2025

## Online Coverage

| No | Portal Name | Headline (Incorporated with URL) | Reach |
|---|---|---|---|
| 1. | The Times of India | Srinivas gets additional charge as head of BEST | 64.4M |
| 2. | Loksatta - Marathi Newspaper | मालमत्ता हस्तांतरण ‘डीआरपी"कडून धारावीतील पालिकेच्या जागेवरील इमारतींसाठी नियम,... | 33.4M |
| 3. | Saamana | बेस्टचा कारभार श्रीनिवासन यांच्याकडे | 1.2M |
| 4. | Saamana | देवनारचा भूखंड अदानीच्या घशात घालण्यासाठीच ‘कचरा कर"! आदित्य ठाकरे यांचा घणाघात | 1.2M |
| 5. | Hotlinenews | VLTની જમીન પર ધારાવી રિડેવલપમેન્ટ પ્રોજેક્ટ ઓથોરિટીનો જ અધિકાર: BMC | N/A |
| 6. | Rokthok Lekhani | महाराष्ट्र में 80 से 10 मिलियन तथा मुंबई में 8 से 10 लाख बांग्लादेशी घुसपैठिये | N/A |
| 7. | Rokthok Lekhani | मुंबई के निवासियों को धारावी में अडानी समूह द्वारा भूमि अधिग्रहण के लिए फंड देने... | N/A |